# MT 154

**2017 .... .... 1100** **Seat No.** | | | | | | | |

**–MT 154 –SOCIAL SCIENCE (73) GEOGRAPHY & ECONOMICS (M) – SEMI PRELIM I–
PAPER - B**

**Time : 2 Hours** **(Pages 3)** **Max. Marks : 40**

---

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
(२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
(३) प्रश्न ३(अ) साठी पुरवलेल्या आलेख कागदाचा वापर करावा व तो मुख्य उत्तरपत्रिकेला जोडावा.
(४) प्रश्न ३(क) साठी पुरवलेल्या भारताच्या नकाशा आराखड्याचा वापर करावा व तो मुख्य उत्तरपत्रिकेला जोडावा.
(५) नकाशा काढण्यासाठी स्टेनसिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
(६) आवश्यक तेथे आकृत्या काढा.

**प्र.१. (अ) कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.** **3**

(१) अति पर्जन्याच्या क्षेत्रात ............ मृदा तयार होते. (काळी, जांभी, वाळवंटी, रेताड)
(२) पश्चिम घाट आणि पूर्व घाट या ........... पठाराच्या सीमा आहेत. (दखखन, तिबेट, पामीर)
(३) पश्चिम घाटात ........... हे सर्वाधिक उंचीचे शिखर आहे.
(अन्नाईमुडी, दोडाबेट्टा, अन्नामलाई, के-२)

**प्र.१. (ब) 'अ' स्तंभ व 'ब' स्तंभ यांच्या योग्य जोड्या लावा.** **3**

| 'अ' स्तंभ | 'ब' स्तंभ |
|---|---|
| (१) चिंध्यांच्या बाहुल्या | (अ) उर्दू |
| (२) हैद्राबाद | (ब) तोडा |
| (३) अगाती | (क) विमानतळ |
| | (ड) इंदोर |

**प्र.२. (अ) खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा. (कोणतीही दोन)** **4**

(१) दखखनच्या पठारावर पर्यटन व्यवसायाचा चांगला विकास झालेला आहे.
(२) छोटा नागपूर पठारावर खाणकाम मोठ्या प्रमाणावर विकसित झाले आहे.
(३) लक्षद्वीप बेटांवरील पारिस्थितीकी अत्यंत नाजूक आणि अद्‌वितीय आहे.

**प्र.२. (ब) थोडक्यात टीपा लिहा. (कोणत्याही दोन)** **4**

(१) मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशातील उद्योगधंदे
(२) गुजरातची किनारपट्टी
(३) दखखनच्या पठारावरील नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरणीय समस्या

प्र. ३. (अ) खालील सांख्यिकीय माहितीच्या आधारे विभाजित आयत तयार करा. 2

| भारत – भूमी उपयोग | |
|---|---|
| भूमी प्रकार | प्रमाण टक्क्यांमध्ये |
| वनांखालील क्षेत्र | 23 टक्के |
| बिगर लागवडीखालील क्षेत्र | 13 टक्के |
| चराऊ व लागवडीखालील क्षेत्र | 10 टक्के |
| पडीत क्षेत्र | 8 टक्के |
| लागवडीखालील क्षेत्र | 46 टक्के |

प्र. ३. (ब) खालील नकाशाचे वाचन करुन त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) 2




(१) महाराष्ट्र पठारावरील प्रमुख नद्यांची नावे लिहा.
(२) पश्चिम वाहिनी नद्यांची नावे लिहा.
(३) कर्नाटक पठारावरील दोन टेकड्यांची नावे लिहा.
(४) कृष्णा नदीच्या उपनदीचे नाव लिहा.

**प्र.३. (क) तुम्हांस पुरविलेल्या भारताच्या आराखड्यात पुढील घटक दाखवा, तसेच त्यांची नावे द्या व चिन्हांची सूची द्या. (कोणतेही दोन)** **2**

(१) बुंदेलखंड
(२) माळव्याचे पठार
(३) बॅरन बेट
(४) महादेव-मैकल रांग

**प्र.४. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **8**

(१) पश्चिम घाटातील लोकसंख्या आणि वसाहतींविषयी सविस्तर माहिती लिहा.
(२) भारताच्या मध्यवर्ती प्रदेशातील पर्यावरणीय समस्या सविस्तरपणे स्पष्ट करा.
(३) द्वीपकल्पीय पठारावरील हवामानाची माहिती लिहा.

## अर्थशास्त्र

**प्र.५. कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.** **2**

(१) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना ......... रंगाची शिधापत्रिका असते. (पिवळ्या, केशरी, शुभ्र)
(२) आर्थिक प्रश्न मुख्यतः साधनांच्या ............ निर्माण होतो. (विपुलतेमुळे, दुर्मिळतेमुळे, उपलब्धतेमुळे)

**प्र.६. खालील प्रश्नांची प्रत्येकी एक किंवा दोन वाक्यांत उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **6**

(१) लक्ष्याधारित सार्वजनिक वितरण प्रणाली स्पष्ट करा.
(२) उत्पादन तंत्राची निवड कशावर अवलंबून असते?
(३) सार्वजनिक वितरण प्रणालीचे कोणतेही दोन फायदे लिहा.
(४) अर्थव्यवस्थेच्या मूलभूत समस्या कोणत्या आहेत?
(५) सार्वजनिक वितरण प्रणालीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी कोणाची आहे?

**प्र.७. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर पाच ते सहा ओळींत लिहा.** **4**

(१) अन्नभेसळीचे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लिहा.
(२) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मूलभूत समस्या कशा सोडवल्या जातात?

**Best Of Luck**